# सिन्नर पंचायत समिती, सिन्नर, जिल्हा नाशिक या संस्थेचा सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल.

जा.क्र.स्था-३/ब/जिप-पंस/लेपअ-सिन्नर/नाशिक/

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांक :-

प्रेषक
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक.

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद-नाशिक

सिन्नर पंचायत समिती, सिन्नर, जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण श्री. र. ह. झगडे, निवडश्रेणी लिपीक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १५.९.२००८ ते १०.१०.२००८ या कालावधीत पूर्ण केले. या अहवालाचे पुनर्विलोकन श्री. उ. प्र. जोशी, लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनाक २१.१०.२००८ रोजी केले. या अहवालावर चर्चा करुन अहवालाचे अंतिमीकरण श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २३.१०.२००८ रोजी केले.

लेखा परीक्षीत आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

## सभापती

| | |
|---|---|
| श्रीमती. सुनीता श्रीपत निकम | ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ |

## गट विकास अधिकारी

| | |
|---|---|
| श्री. आर. बी. भालेराव (प्र) एबावियो | ०१.०४.२००७ ते १०.०६.२००७ |
| श्रीमती. एम. डी. जगताप | ११.०६.२००७ ते ३१.०३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखा परीक्षण)

---

मागील लेखा परीक्षण अहवालातील खालील परिच्छेद थकीत असुन त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्र पत्रव्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| १ | १९७३-७४ | १४<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.१४-बियाण्याच्या रक्कमेबाबत (२९४) | १ |
| २ | १९८९-९० | २४ | १ |
| ३ | १९९३-९४ | ७,१२ | २ |
| ४ | १९९४-९५ | २० | १ |
| ५ | १९९६-९७ | ८ | १ |
| ६ | १९९८-९९ | २२ | १ |
| ७ | २०००-०१ | १५,१७,२८,२९,३०,३५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.१५-जिल्हा निधी रोखवहीतील ताळमेळाबाबत (४.१७९)(३)<br>परि.क्र.१७-तालुका मास्तर रोकडवहीतील ताळमेळ पत्रकाबाबत (४.१७९)(४)<br>परि.क्र.२८-सिमेंट साठा नोंदवहीबाबत (४.१८०(८)<br>परि.क्र.२९-सिमेंट साठा नोंदवहीबाबत (४.१८०(९)<br>परि.क्र.३५-अपूर्ण बांधकामाबाबत(४.१८२)(२६) | ६ |
| ८ | २००१-०२ | ११,१४,१५,१६,२३<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.१४- सिमेंट गोण्यांची रक्कम थकबाकीबाबत.<br>परि.क्र.१५: बॉयोगॅस सिमेंट गोणीची रक्कम रु.२८,४१८/- थकबाकीबाबत. | ५ |
| ९ | २००२-०३ | १९ | १ |
| १० | २००३-०४ | १७ | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | २००४-०५ | ३,११,<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३ : तानकरवाडी (पिंपळे) ता.सिन्नर येथे पिण्याची पाणी टाकी बांधणे (४.५४)<br>परि.क्र.११ : अपुर्ण जवाहर विहिरीबाबत (ल.पा)(४.३३२(२६) | २ |
| १२ | २००५-०६ | ३,५(१,२),६(अ,ब),८,२३<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३ : ग्रामीण भागातील मागासवर्गीय शेतक-यांना १०% अनुदानावर सारायंत्र व पाभर पुरविणे. (४.२३५)<br>परि.क्र.२३ : अपूर्ण बांधकामाबाबत. (४.७२८)(३१) | ५ |
| १२ | **सन २००६ – २००७** | | |
| परिच्छेद क्रमांक ३ :- पंचायत समिती सेसचे अंदाजपत्रक | | | |
| परिच्छेद क्रमांक ५ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ६ :- पंचायत समिती सेस अंतर्गत ९० टक्के अनुदानावर मुलींना सायकल पुरविणे. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ७ :- पंचायत समिती सेसमधुन १०० टक्के अनुदानावर ब्रॉसबँड खरेदीबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ८ :- पंचायत समिती सेस मधुन केलेल्या रस्ते दुरुस्तीतीच्या कामातील अनियमिततांबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १० :- थकीत अग्रीम रक्कमा वसुलीबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक १२ :- जवाहर विहीरी योजने अंतर्गत अपूर्ण विहिरी बांधकामाबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक १३ :- अपूर्ण गावतळयांच्या कामांबाबत... (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक १८ :- ग्रामपंचायतींच्या हिशोबातील अफरातफर रकमांचे वसुलीसाठी विहीत कार्यवाही न केलेबाबत... (पंरास प्रस्तावित) | | | |

टिप - उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या-त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायांत नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतिम समजण्यांत यावेत.

## भाग दुसरा
## (चालू लेखा परीक्षण)

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खालील अनियमितता.

### परिच्छेद क्रमांक ३ :- पंचायत समिती सेस अंदाजपत्रकाबाबत.

पंचायत समिती, सिन्नरचे सन २००७ – २००८ चे सुधारीत अंदाजपत्रक ठराव क्रमांक ४७ दिनांक ५.२.२००८ अन्वये मंजुर केले आहे. प्रत्येक शिर्षाखाली केलेल्या तरतुदीचा व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

(आकडे रुपयांत)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सुधारीत तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३ शिक्षण | ५,००० | -- | ५,००० | -- |
| २ | ४ बांधकाम | २,००,००० | ४५,००० | १,५५,००० | -- |
| ३ | ८ सार्व.आरोग्य | ५,००० | -- | ५,००० | -- |
| ४ | शेती | -- | -- | -- | -- |
| ५ | १४ समाजकल्याण | ६०,००० | ७१,४७८ | -- | ११,४७८ |
| ६ | १२ पशुसंवर्धन | -- | -- | -- | -- |
| ७ | २० संकीर्ण (मवबाक) | ३०,००० | २८,९९५ | १,००५ | -- |
| | | ३,००,००० | १,४५,४७३ | १,६६,००५ | ११,४७८ |

पंचायत समिती सेस रोखवहीनुसार सुरुवातीची शिल्लक रुपये २०,६५३/- असून सन २००७ – २००८ वर्षात प्राप्त रक्कम रुपये ४,३९,४१४/- असे एकूण शिल्लक जमा रुपये ४,६०,०६७/- असून मार्च २००८ अखेर शिल्लक रुपये ३,१४,४२५/- असल्याचे आढळून आले.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) वरील अ.क्र. १,२,३,७ या लेखाशिर्षाखाली तरतुद करण्यात आली असून, केलेल्या तरतुदीपेक्षा कमी खर्च करण्यात आलेला आहे. म्हणजेच तेवढया रकमेचे लाभापासून लाभार्थ्यांना वंचित रहावे लागले आहे. तरी कमी खर्चाच्या बाबी पंचायत समितीचे निदर्शनास आणुन समितीचे क्षमापन घेण्यात यावे.

२) यापुढे वास्तववादी अंदाजपत्रक तयार करुन तरतुदीनुसार खर्च करण्याची दक्षता घेण्यात यावी.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- पंचायत समिती सेस अंतर्गत १०० टक्के अनुदानावर मुलींना सायकल पुरविणे.**

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रुपये | तपशील |
|---|---|---|---|
| २ | ३१.३.२००८ | २८,९९५ | मीना एंटरप्रायझेस, पिंपळगाव बसवंत, नाशिक यांच्याकडून १५ नग प्रति नग रुपये १,९३३/- या दराने सायकल खरेदी. |

पंचायत समिती सिन्नरकडून १०० टक्के अनुदानावर मुलींना सायकल पुरविणेकरीता रक्कम रुपये २८,९९५/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत:

१) पंचायत समिती ठराव क्रमांक ५१ दिनांक १३.३.२००८ अन्वये लाभार्थ्यांची निवड करण्यात आल्याची नोंद असून त्यामध्ये लाभार्थी यादी नमुद नाही. त्यामुळे लाभार्थी निवड कशाच्या आधारे केली याचे स्पष्टीकरण देऊन पंचायत समिती सभेचे क्षमापन घ्यावे.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए-२०००/ प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१०.२००१ नुसार सदरची योजना ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानूसार राबविण्यात आलेली नाही.

३) मास्टर नोंदवहीत यापूर्वीच्या नोंदी नसल्याने एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ देण्यात आला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

५) साठा रजिष्टरमध्ये नगांची नोंद असून साहित्य कोणते प्राप्त झाले त्याची नोंद नाही. डिलीव्हरी चलनावर सायकली प्राप्त तारीख व सायकल फ्रेमचे नंबर नमुद नसल्यामुळे संबंधीतांना त्याचा लाभ केव्हा झाला, याबाबत स्पष्टीकरण करावे.

६) महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३(३) नुसार गटविकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र दिलेले नाही. त्यामुळे सायकलची गुणवत्ता व दर्जा याची खात्री न करता देयकाची रक्कम रुपये २८,९९५/- प्रदान केल्याचे पोहच पावतीवरुन दिसून येते.

वरील अनियमिततांची पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये २८,९९५/- लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
एकात्मिक बाल विकास योजना
आक्षेपाधिन रक्कम रुपये २८,९९५/-
पंचायत समिती सेस अनुदान
पंचायत समिती सिन्नर

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खालील अनियमितता.

---

### परिच्छेद क्रमांक ५ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत.

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती सिन्नर येथील वाहन क्र. एम.एच.१५/ए.ए.५०८९ च्या वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली. लेखापरीक्षण वर्षात वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरले असून सोबतच्या परिशिष्ट क्र. “ १ ” मध्ये त्याचा तपशील जोडला आहे.

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय, वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र-३३/सेवा-५/दि.८.७.१९९५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर १२८१ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये १०,२४८/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये १०,२४८/-

---

### परिच्छेद क्रमांक ६ :- बाहयरुग्ण फी भरणा न केलेबाबत.

पंचायत समिती, सिन्नर अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्र, ठाणगाव यांचेकडील सन २००७ – २००८ मधील बाहय रुग्ण फी जमा रोखवहीची पडताळणी केली असता खालील दर्शविलेप्रमाणे कमी रक्कम जमा केलेली असल्याचे आढळून आले.

(आकडे रुपयांत)

| दिनांक | ओपीडी नोंदवहीनूसार | रोखवहीत जमा | कमी भरणा रक्कम |
|---|---|---|---|
| १४.९.२००७ | ११६ | ८४ | ३२ |
| २८.९.२००७ | १४८ | १४६ | २ |
| | | **एकूण** | **३४** |

वर्षातील लेखापरीक्षणासाठी निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांमध्ये अशा स्वरुपाची अनियमितता नसल्याचे अंतर्गत लेखापरीक्षण विभागाकडून प्रमाणित करवून कमी भरणा रक्कम रुपये ३४/- संबंधीतांकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ७ :- केंद्र प्रमुखांनी ४ टक्के सादील रकमेतून फिरती भत्ता रक्कम खर्च केलेबाबत.</u>**

पंचायत समिती, सिन्नरच्या सन २००७ – २००८ मधील शिक्षण उपविभागांतर्गत ४ टक्के सादील रोकडवहयांचे लेखापरीक्षण केले असता, केंद्र शाळा पाथरी यांनी खालीलप्रमाणे रोकडवहीला फिरती भत्ता रकमा खर्च दाखविलेल्या आहेत.
प्रमाणक क्रमांक ४, दिनांक ५.१०.२००६ -रुपये १,२०० (श्री.बा.सी.क्षत्रिय, केंद्रप्रमुख)
प्रमाणक क्रमांक १०, दिनांक १५.२.२००८ - रुपये १,००० (श्री.सु.श.अहिरे, केंद्रप्रमुख)

वेतनबिलामध्ये केंद्रप्रमुख यांना प्रतिमहा रुपये २००/- प्रमाणे एकूण रुपये २,४०० फिरती भत्ता अदा करण्यात येत असूनही उपरोक्त दर्शविलेल्या २ केंद्रप्रमुखांनी ४ टक्के सादील रकमेतून कायम फिरती भत्ता एकूण रक्कम रुपये २,२००/- रोकडवहीला खर्च दाखविलेला आहे. संबंधित केंद्रप्रमुखावर उचित प्रशासकीय कारवाई करुन रक्कम रुपये २,२००/- संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ८ :- हातपंप व विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत.</u>**

लेखा परीक्षीत आर्थिक वर्षात ठेवण्यात आलेल्या हातपंप/ विद्युतपंप देखभाल दुरुस्ती नोंदवहीची पडताळणी केली असता, सोबतच्या परिशिष्ट क्रमांक २ मध्ये दर्शविणेत आलेप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर हातपंप देखभाल दुरुस्ती वर्गणी रक्कम रुपये ७०,८२४/- व विद्युत पंपाची वर्गणीची रक्कम रुपये ३०,७९६/-, अशी एकूण रुपये १,०१,६२०/- अदयापही ग्रामपंचायतीकडुन वसुल होणे बाकी आहे.

याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे आदेश क्रमांक भुजल १०९५/ जा.क्र.२१७/४३ दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप/विदयुतपंपाची देखभाल दुरुस्तीची

प्रलंबित वर्गणी संबधित ग्रामपंचायतीकडून रोख स्वरुपात अथवा त्यांना पंचायत समितीमार्फत देय विविध अनुदानांतुन सत्वर वसुल करुन पुर्तता लेखा परीक्षणात दाखवावी.

हातपंप व विद्युत पंप वर्गणी थकबाकीबाबत मागील लेखा परीक्षण अहवाल सन २००६ – २००७ मध्ये आक्षेप क्रमांक ११ नमुद करण्यांत आलेला होता. तथापि आक्षेपांची पुनरावृत्ती टाळणेसाठी सदरचा आक्षेप वगळण्यांत आलेला आहे. तरी पूर्ण वसूली करुन अनुपालन दाखवावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( क ) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- अग्रिम नोंदवहीबाबत.**

या अहवालासोबत जोडण्यांत आलेले विवरणपत्र क्रमांक “ ३ ” नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर रक्कम रुपये ३,९४,०३५/- कार्यालयाच्या कर्मचारी / प्राथमिक शिक्षक यांचेकडे उत्सव, धान्य, खातेप्रमुख अग्रिम स्वरुपात सन २००५ – २००६ पासून थकीत असल्याचे दिसून येते.

शासन निर्णय, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, क्रमांक लेपुअ/ १०९२/प्र.क्र.१४६९/३० दिनांक २६.२.१९९३ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन थकीत अग्रीमाची रक्कम रुपये ३,९४,०३५/- वसूल करणेची कार्यवाही करावी.

तसेच देण्यांत आलेल्या अग्रीम रक्कमेची वसूली / समायोजन वेळीच होणे आवश्यक आहे. अग्रीम रक्कमांची वसूली न झाल्यास जबाबदार असणारे अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करुन विहीत दंडनीय कार्यवाहीसह रक्कम वसूलीची कार्यवाही पूर्ण करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक १० :- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेबाबत.**

पंचायत समिती, सिन्नर सन २००७ – २००८ च्या लेखापरीक्षणात शिक्षण व ग्रामसेवक आस्थापना लेख्यांची तपासणी केली असता, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी कंत्राटी/मानधनावर लागलेल्या परंतु दिनाक १ नोव्हेंबर २००५ नंतर कायम केलेल्या, या अहवालासोबतचे परिशिष्ट क्रमांक ३ नुसार काही कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधी वर्गणी रक्कम कपात केलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ व शासन निर्णय क्रमांक अंनियो १००७/१८/सेवा-४ दिनाक ७ जुलै २००७ अन्वये जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ लागू होत नाही. त्यामुळे परिशिष्ठात नमुद काही कर्मचा-यांची जी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये होणारी कपात ही चुकीची असून, त्यांना उपरोक्त शासन निर्णयानूसार स्तर १ लागु होतो. त्यात त्यांची मुळ वेतन + महागाई वेतन + महागाई भत्ता या रक्कमेच्या १० टक्के रक्कम कपात करुन ठेव या शिर्षाखाली जमा करावयाची आहे.

२) जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले त्यांच्याबाबत अद्यापही परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेची रक्कम कपात करण्यात येत नसल्याने याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे दोन्हीही कर्मचा-यांची शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे अंशदान कपात करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानासाठी अनुज्ञाप्ती शुल्क/सेवाशुल्क वसुलीबाबत.**

पंचायत समिती, सिन्नर सन २००७ – २००८ मधील अभिकरण योजनेकडील निवडक महिन्यांतील प्रमाणके तपासणी केली असता प्रमाणक क्रमांक १५/२५.३.२००८ व प्रमाणक क्रमांक ३५/३१.३.२००८ मध्ये खालील नमुद केलेल्या कर्मचा-यांच्या वेतन बिलामध्ये घरभाडे भत्ता प्रदान करण्यात आलेला नसून, संबंधीतांच्या वेतनातून अनुज्ञप्ती शुल्काच्या रकमा कपात करण्यात आलेल्या नाहीत.

| अ.क्र. | प्रमाणक क्र.दि. | कर्मचा-यांचे नांव | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | १५/२५.३.२००८ | श्री. एस.डी.साबळे | प्रा.आ.केंद्र, नायगाव |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | --,,-- | श्री. डी.एस.पवार | --,,-- |
| ३ | --,,-- | श्री. पी.एस.सोनवणे | --,,-- |
| ४ | --,,-- | श्री. ए.पी.गुरव | --,,-- |
| ५ | ३५/३१.३.२००८ | श्री. एस.बी.बच्छाव | प्रा.आ.केंद्र, पांढुर्ली |
| ६ | --,,-- | श्री. जे.एम.जोशी | --,,-- |
| ७ | --,,-- | श्री. ए.आर.तवर | --,,-- |
| ८ | --,,-- | श्री. जी.पी.शिंपी | --,,-- |
| ९ | --,,-- | श्री. ए.बी.वाल्मीक | --,,-- |
| १० | --,,-- | श्री. एम.एन.मिस्त्री | --,,-- |

उपरोक्त प्रमाणे शासन निर्णय क्रमांक घभाव-२०००/प्र.क्र.९७/२०००/ सेवा-५, मुंबई -३२ दिनांक १७ फेब्रुवारी २००१ अन्वये तसेच मुंबई नागरी सेवा नियम १९५९ खंड - १ मधील नियम ८४९ (बी) च्या तरतुदीनुसार कर्तव्यस्थानी दिलेल्या वित्तलब्धीच्या १०% किंवा निवासस्थानाच्या प्रमाणित भाडे यांपैकी जे कमी असेल तेवढे अनुज्ञप्ती शुल्क वसुल करावे, अशी तरतुद असतांना चटई क्षेत्रानुसार अनुज्ञप्ती शुल्क/सेवा शुल्क रकमा संबंधितांना निवासस्थान जेंव्हापासून वाटप केले तेंव्हा पासून परिगणना करावी व संबंधीताकडून रक्कमा वसुल करुन जिल्हापरिषद निधीत भरणा करावी व तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- शिक्षकांना प्रदान केलेल्या फरकाच्या रकमांची नोंद सेवा पुस्तकात न घेतलेबाबत.**

पंचायत समिती, सिन्नर कडील सन २००७-०८ मधील जिल्हानिधी प्रमाणकांची तपासणी केली असता, या अहवालासोबतचे परिशिष्ट क्रमांक “ ४ ” नुसार एकूण २४ शिक्षकांना वेगवेगळया प्रमाणकांव्दारे चटोपाध्याय वेतन फरक, शिक्षण सेवकातून नियमित वेतनश्रेणी मंजुर झाल्याचा वेतन फरक, वेतनवाढ फरक, मुख्याध्यापक पदोन्नती फरक, मानीव वेतनवाढ फरक, आगाऊ वेतनवाढ फरक व वेतनत्रुटीच्या वेतन फरकाच्या रकमां शिक्षकांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

तथापी संबंधीत कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकाची पडताळणी केली असता त्यात प्रदान केलेल्या फरकाच्या नोंदी घेतलेल्या नसल्याचे आढळून आले. देयक पारीत करतांना लेखा विभागाने संबंधीताचे सेवा पुस्तकाची पडताळणी करुनच देयक पारीत करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे भविष्यात अशाप्रकारच्या फरकाची दुबार बिले अदा केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी याबाबतच्या सविस्तर नोंदी (प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम, कालावधी) सेवा पुस्तकात घेऊन या अनियमिततेबाबत मुख्य लेखा व वित्त अधिका-यांचे क्षमपान घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- व्यवसाय कर माफ असल्याचे प्रमाणपत्र सेवापुस्तकात नसलेबाबत.**

पंचायत समिती, सिन्नर अधिनस्त शिक्षण उपविभागाकडील सेवा पुस्तकांची पडताळणी केली असता, खालीलनमुद केलेल्या अस्थिव्यंग/अपंग प्राथमिक शिक्षकांच्या वेतन बिलातून व्यवसाय कराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

१. श्री. रामभाऊ महादु कातकाडे, प्राथमिक शिक्षक, ब्राम्हणवाडे

२. श्री. सुशिल छबिलदार बोरसे, प्राथमिक शिक्षक, मोहदरी

३. श्री. निवृत्ती संपत पाटोळे, प्राथमिक शिक्षक, गोंदे

व्यवसाय कर माफ असलेबाबत सक्षम अधिका-याचे दाखले संबंधीताच्या सेवापुस्तकात जोडलेले नसतांना तसेच सेवा पुस्तकातही नोंदी नसतांना व्यवसाय कराच्या रकमा का कपात करण्यात आलेल्या नाहीत याबाबत जबाबदारी निश्चित करुन संबंधीत शिक्षकांची लेखापरीक्षण कालावधीअखेर न कपात केलेली व्यवसाय कराची रक्कम परिगणीत करुन त्यांचेकडून वसुल करण्यात यावी व सदरची रक्कम योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- निवृत्तीवेतन व कुटूंब निवृत्तीवेतन नस्ती उपलब्ध नसलेबाबत.**

पंचायत समिती, सिन्नरच्या सन २००७-०८ मधील ३-शिक्षण निवृत्तीवेतन प्रकरणांची पडताळणी केली असता या अहवालासोबतचे परिशिष्ट क्रमांक “ ५ ” नुसार एकूण १६ निवृत्तीवेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांच्या नस्त्या/आदेश/पीपीओ व त्यासंबंधीची आवश्यक ती कागदपत्रे दप्तरी उपलब्ध नाहीत. सदर कागदपत्रे उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमासिय पत्र क्रमांक ३२ दिनांक २२.९.२००८ व पुन्हा अर्धसमासिय पत्र क्रमांक ४४ दिनांक २३.१०.२००८ संबंधितांस कळवण्यिांत आले होते. तथापि लेखापरीक्षण कालावधी पावेतो सदरची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध केले नाहीत.

सदरच्या नस्त्या उपलब्ध नसतांना संबंधीतांना निवृत्तीवेतन/कुटूंब निवृत्तीवेतनाच्या रकमा, महागाई वेतन तसेच पेन्शन विक्री रकमेची वजावट काय आधारे दर्शवुन त्यांचे निवृत्तीवेतन अदा केले जाते, याबाबत साशंकता आहे.

याबाबत संबंधीत अधिकारी वा कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन झालेले प्रदान योग्य असल्याबाबत संबंधीत अंतर्गत लेखापरीक्षण

विभागाकडून प्रमाणित करवून व सदर अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- निवृत्तीवेतन व कुटूंब निवृत्तीवेतन सुधारीत आदेश उपलब्ध नसलेबाबत.**

पंचायत समिती, सिन्नर सन २००७-०८ मधील ३-शिक्षण निवृत्तीवेतन प्रकरणांची पडताळणी केली असता या अहवालासोबतचे परिशिष्ट क्रमांक “ ६ ” नुसार एकूण ११ निवृत्तीवेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांचे ५० टक्के महागाई वेतनाचे मुळ वेतनात विलीनीकरण करुन पारित झालेले सुधारीत निवृत्तीवेतन प्रदान आदेश दप्तरी उपलब्ध नाहीत. सदरचे सुधारीत निवृत्ती वेतन प्रदान आदेश तपासणीस उपलब्ध करणेबाबत वेळोवेळी तोंडी व अर्धसमासिय पत्र क्रमांक ४४ दिनांक २३.१०.२००८ अन्वये संबंधितांस कळविण्यांत आले होते. तथापि दिनांक ३१.१०.२००८ अखेरच्या मुदतीतही सदर आदेशांच्या प्रती लेखापरीक्षणांस उपलब्ध केल्या नाहीत.

सदरचे आदेश उपलब्ध नसतांना संबंधीतांना निवृत्तीवेतन/कुटूंब निवृत्तीवेतनाच्या रकमा, महागाई वेतन तसेच पेन्शन विक्री रकमेची वजावट काय आधारे दर्शवुन त्यांचे निवृत्तीवेतन अदा केले जाते, याबाबत साशंकता निर्माण होते.

तसेच पंचायत समितीने इतरही विभागातील निवृत्ती वेतनाबाबतच्या दस्तऐवजांची आपल्या स्तरावरुन खात्री करुन निवृत्तीवेतन योग्य प्रदान होत असल्याबाबत प्रमाणित करावे.

याबाबत संबंधीत अधिकारी वा कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन झालेले प्रदान योग्य असल्याबाबत संबंधीत अंतर्गत लेखापरीक्षण विभागाकडून प्रमाणित करवून व सदर अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- भविष्य निर्वाह निधीची वर्गणी ६ टक्के पेक्षा कमी कपात केलेबाबत.**

पंचायत समिती, सिन्नर अधिनस्त शिक्षण उपविभागाचे फेब्रु. पेड मार्च ०८ वेतन देयकाची पडताळणी केली असता, खालील दर्शविलेप्रमाणे भविष्य निर्वाह निधी वर्गणी कपातीच्या शेडयूलमध्ये कर्मचा-यांची वर्गणी ६ टक्केपेक्षा कमी कपात केल्याचे स्पष्ट झाले आहे.

(आकडे रुपयांत)

| शिक्षकाचे नांव | मुळ वेतन व ५० टक्के महागाई वेतन | कपात केलेली वर्गणी | कपात करावयाची ६ टक्के वर्गणी |
|---|---|---|---|
| श्रीमती शि.स.वैद्य | ११,९२५ | ५०० | ७१५ |
| श्रीमती र.श्री.जाखडी | १०,६१३ | ५०० | ६३६ |
| श्रीमती र.पा.कोढीलकर | १०,४२५ | ५०० | ६२५ |
| श्रीमती न.ग.काजळे | ११,६६३ | ५०० | ७०० |
| श्रीमती श.कृ.पितळे | १०,२०० | ५०० | ६१२ |
| श्री ना.भ.मोरे | १०,३५० | ५०० | ६२१ |
| श्री. ज.द.शिंदे | १०,३५० | ५०० | ६२१ |
| श्री. भा.नि.म्हस्के | ८,८१३ | २०० | ५२९ |
| श्री. ए.पां.म्हसाळ | ११,४०० | ५०० | ६८४ |
| श्री. श.नि.कोठावदे | १०,३५० | ५०० | ६२१ |

महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९६६ मधील नियम ८ (१) (ब) नुसार वर्गणीचा दर वर्गणीदाराच्या वित्तलब्धीच्या ६ टक्के रक्कमेपेक्षा कमी नसेल आणि त्याच्या एकूण वित्तलब्धी पेक्षा जास्त नसेल, अशी तरतुद असतांनाही शिक्षण उपविभागाकडून उपरोक्त कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनांस आले. उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे.

तसेच इतरही विभागातील कर्मचा-यांच्या वेतन देयकातून नियमाप्रमाणे भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात करण्यात येत असल्याची खात्री लेखा विभागाने करावी व तसेच अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १७ :- बाहयरुग्ण फी उशिरा भरणा केलेबाबत.**

पंचायत समिती, सिन्नरकडील सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या रोकडवहयांची तपासणी केली असता जनावरांसबंधी बाहयरुग्ण फी दर एक महिन्याने भरणा केल्याची आढळली.

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहीता, १९६८ चे नियम १३ अन्वये वसुल केलेली रक्कम दररोज जमा करणे आवश्यक आहे. नियम क्रमांक ४९ अन्वये उशिरात उशिरा १५ दिवसात रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. बाहयरुग्ण फी जास्त दिवस हातात ठेवणे ही बाब नियमबाहय असून उशिरा भरणा केलेबाबत संबंधितांवर उचित प्रशासकीय कारवाई करुन त्याचे अहवालासह अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १८ :- करारपत्राची नोंदवही न ठेवणेबाबत.**

जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम १४७ नुसार प्रत्येक मंजुर कराराची फॉर्म नंबर ४८ मधील नमुन्यात नोंदवही परीरक्षीत करुन त्यामध्ये नोंद घेण्यात यावी व प्रत्येक नोंदीखाली लेखाधिका-याने स्वाक्षरी करावी अशी तरतुद आहे. मात्र पंचायत समितीने अशाप्रकारची नोंदवही परीरक्षीत केलेली नाही. त्यामुळे पंचायत समितीने आजपावेतो कोणत्या कामासाठी कोणत्या मक्तेदाराबरोबर करार केलेले होते, कराराप्रमाणे विहित वेळेत काम पूर्ण झाले किंवा कसे इत्यादीबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

तरी आजपावेतो केलेल्या कराराबाबतच्या नोंदी फॉर्म नंबर ४८ मध्ये घेऊन त्या नोंदीखाली सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- क्षेत्रीय अधिकारी वा कर्मचारी यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा केलेबाबत.**

पंचायत समिती, सिन्नर येथील सन २००७-०८ वर्षात खालीलप्रमाणे नमुद अधिकारी वा कर्मचारी यांच्या मासिक दैनंदिन्या मुदतीत प्राप्त झालेल्या नसल्याचे नोंदवहीवरुन दिसून आले.

| अ.क्र. | नांव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्री. अे.एम.शेख | शाखा अभियंता | ऑगष्ट ०७ ते मार्च ०८ |
| २ | श्री. एस.जी.पाटील | शाखा अभियंता | एप्रिल ०७ ते जुलै ०७,<br>ऑक्टों.०७ ते मार्च ०८ |
| ३ | श्री. एस.जी.भामरे | शाखा अभियंता | एप्रिल ०७ ते जुलै ०७ |
| ४ | श्री. पी.एस.देवरे | शाखा अभियंता | ऑगष्ट ०७ ते मार्च ०८ |
| ५ | श्री. अे.व्ही. उगले | कनिष्ठ अभियंता | एप्रिल ०७ |
| ६ | श्री. एच.के.चौधरी | स्था.अभियांत्रिकी सहा. | मार्च ०८ |
| ७ | श्री. पी.अे.पाटील | कं.ग्रामसेवक | फेब्रु, मार्च ०८ |
| ८ | श्री. डी.बी.भोसले | ग्रामसेवक | फेब्रु, मार्च ०८ |
| ९ | श्री. डी.बी.कोळपे | ग्रामसेवक | फेब्रु, मार्च ०८ |
| १० | श्री. सी.एस.पगार | पशुधन पर्यवेक्षक | जुलै ते सप्टें.०७ फेब्रु ०८ |
| ११ | श्री. सी.एन.हजारी | सहा.पशुधन विकास अधिकारी | जुलै ते ऑक्टों.०७<br>फेब्रु.०८ ते मार्च ०८ |

उपरोक्त नमुद अधिकारी वा कर्मचारी यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा करणेबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. अदा केलेल्या संपूर्ण कालावधीत हे सर्व कर्मचारी व अधिकारी विहित कर्तव्यासाठी कार्यरत असल्याचे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- विनावापर पडून असलेली यंत्रसामुग्रीबाबत.**

अर्धसमास पत्र क्रमांक १० दिनांक १७.९.२००८ नुसार विनावापर पडून असलेल्या यंत्रसामुग्रीबाबतची माहिती उपविभाग (इ व द), सिन्नर यांनी सादर केल्यानुसार त्यांचेकडे रोडरोलर क्रमांक बी.आर.आर. १११२ व जिप क्रमांक एम.वाय.झेड. ७३७५ विनावापर असून त्यांची दुरुस्ती किफायतशीर नसल्याचे नमुद केले आहे.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवा योजना विभाग, शासन निर्णय क्रमांक आयटीआय/३०९४/४०७४/व्यशि-१ दिनांक ४.२.१९९५ नुसार कार्यालयात ज्या नियमित वापराच्या दृष्टीने अयोग्य अशा यंत्रसामुग्री / वस्तु निर्लेखित केल्या जातात, त्या लिलावाद्धारे विकून टाकण्याऐवजी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षक तंत्रनिकेतन, तंत्र माध्यमिक शाळा, अभियांत्रिकी महाविद्यालये यांना त्यांचेकडील विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी सदर शासन निर्णयात नमुद कार्यपध्दतीचा अवलंब करुन कोणतेही मुल्य न आकारता हस्तांतरीत कराव्यात; असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपअभियंता (लघुपाटबंधारे) उपविभाग यांचेकडील उपरोक्त विनावापर पडून असलेले रोड रोलर हे दुरुस्ती योग्य नसल्याने उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदींनुसार अभियांत्रिकी संस्थांना शासन निर्णयात नमुद कार्यपध्दतीनुसार हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- रिक्त असलेल्या निवासस्थानाबाबत.**

पंचायत समिती, सिन्नर यांचेकडील अर्धसमास पत्र क्रमांक २९ दिनांक १७.९.२००८ अन्वये दिलेल्या माहितीनूसार एकूण ८ निवासस्थाने रिक्त असून सदर निवासस्थानात कोणीही कर्मचारी राहत नसल्याने शासनाने ज्या उद्देशाने निवासस्थान बांधकाम केले आहे तो उद्देश सफल झाला नाही. बांधकाम उपविभागाने त्यांच्या दुरुस्तीची कार्यवाही वेळीच न केल्याने निवासस्थान तसेच पडून राहिल्याने निवासस्थान दुरुस्तीचा खर्च वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. वेळीच निवासस्थान दुरुस्तीसाठी नियोजन न केल्याने निवासस्थान बांधणेचा उद्देश सफल झाला नाही. त्याशिवाय घरभाडे खर्चाची बचत व अनुज्ञप्ती शुल्काच्या होऊ शकणा-या वसुलीसही मुकावे लागले आहे.

याबाबत मागील सन २००६ – २००७ चे लेखापरीक्षण अहवालांत आक्षेप क्रमांक १५ घेऊनही कार्यवाही केलेली नाही. तथापि आक्षेपाची पुनरावृत्ती टाळणेसाठी सदरचा आक्षेप वगळण्यांत आलेला आहे. तरी आक्षेपानुसार कार्यवाही न केलबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी. तसेच याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अहवाल सादर करुन त्यांचे क्षमापन घ्यावे व उचित कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- बांधकाम उपविभाग, सिन्नर यांचेकडील नोंदवही क्रमांक ४१ बाबत.**

पंचायत समिती, सिन्नर बांधकाम उपविभागाकडील नोंदवही क्रमांक ४१ तपासणी केली असता, त्यामध्ये रिकाम्या जागेच्या ठिकाणी ७/१२ उतारे प्राप्त करुन त्या जागेवर अतिक्रमण झालेले नसल्याने उपअभियंता, बांधकाम विभाग हयांनी प्रमाणीत केलेले नाही.

याबाबत मागील लेखापरीक्षण अहवाल सन २००६ – २००७ मध्ये आक्षेप क्रमांक १६ नमुद करण्यांत आलेला होता. तथापि आक्षेपांची पुनरावृत्ती टाळणेसाठी सदरचा आक्षेप वगळण्यांत आलेला आहे. तरी या आक्षेपानुसार पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यांत यावे.

सदरची कार्यवाही तात्काळ करुन पूर्ततेसह अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- लघुपाटबंधारे उपविभागाकडील अपूर्ण मालमत्ता नोंदवह्यांबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ नियम ९७ अन्वये लघुपाटबंधारे उपविभागाने नमुना क्र. ४१ मध्ये स्थावर मालमत्तांच्या नोंदी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. याबाबत मागील लेखापरीक्षण अहवाल सन २००६ – २००७ मध्ये आक्षेप क्रमांक १७ नमुद करण्यांत आलेला होता. तथापि आक्षेपांची पुनरावृत्ती टाळणेसाठी सदरचा आक्षेप वगळलेला आहे.

तरी ७/१२ उतारे प्राप्त करुन त्या जागेवर अतिक्रमण झालेले नसल्याचे उपअभियंता लघुपाटबंधारे यांनी प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेतलेबाबत**

पंचायत समिती, सिन्नरमधील काही कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असले बाबत दाखले दप्तरी नाहीत. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात आला आहे.

१. श्रीमती एम.टी.कुवर, मुख्यसेविका
२. श्रीमती एस.एल.नाईक, मुख्यसेविका
३. श्रीमती एस.ए.आहिरे, मुख्यसेविका
४. श्रीमती पी.डी.सांगळे, मुख्यसेविका
५. श्रीमती एस.के.शिंदे, मुख्यसेविका
६. श्रीमती एम.एस.पाठक, मुख्यसेविका
७. श्रीमती ए.एन.जोशी, मुख्यसेविका
८. श्रीमती एम.बी.पाचोरे, मुख्यसेविका
९. श्री. आर.एन.आव्हाड, वाहन चालक
१०. श्री. एम.पी.बैरागी, कनिष्ठ सहाय्यक
११. श्रीमती आर.के.मिठे, कनिष्ठ सहाय्यक
१२. श्री. एन.एन.कर्पे, कनिष्ठ सहाय्यक
१३. श्री. आर.टी.भवर, वाहन चालक
१४. श्री. ए.एन.जाधव, वाहन चालक
१५. श्री. व्ही.व्ही.जाधव, वाहन चालक
१६. श्रीमती व्ही.व्ही.आहेर, औषध निर्माता
१७. श्री. ए.आर.राजभोज, औषध निर्माता
१८. श्री. बी.एम.वावीकर, कनिष्ठ सहाय्यक

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ४३(३) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त नियमांप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणात दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- पोच पावत्या उपलब्ध न करणेबाबत.**

पंचायत समिती, सिन्नर येथील सन २००७-२००८ चे लेखापरीक्षण केले असता जिल्हा निधी रोकडवही मधून ग्रामपंचायतींना अनुदाने वाटप करण्यात आल्याबाबत खर्च नमुद करण्यात आला आहे. मात्र रक्कमा संबंधित ग्रामपंचायतींना मिळाल्याबाबतच्या पोच पावत्या नमुना नंबर ७ उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे संबंधितांना रक्कमा

मिळालेबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. पोचपावत्या उपलब्ध करुन अनुपालन दाखवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २६ :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण असणेबाबत.</u>**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व नोंदवहीची गट विकास अधिकारी याने प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती सिन्नर यांचेकडील गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (ए.पि.पि.९) मधील लेखा परीक्षा नोंदवही व नमुना ए.पी.पी. १० मधील नोंदवही यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व तृटी आढळून आलेल्या आहेत.

१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखा परीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्त्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रतयेक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधिच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बँकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी, अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बँकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बँकेमार्फत निवृत्ती वेतन घेणा-या पेन्शन धारकास प्रत्येक वर्षी जीवन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवन प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या पेन्शन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्ती वेतन धारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन

बिलासोबत जोडण्यांत यावे असे प्रमाणपत्र देण्यात कसून झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबंद केलेली नाहीत.

५. निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भाकिंत लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी खर्च करावा लागत आहे.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. तरी संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी व निवृत्ती वेतन लेखा परीक्षा नोंदवही व आदेश सर्व नोंदवहीसह अद्ययावत पुर्तता लेखापरीक्षणांस दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- अपूर्ण बांधकामाबाबत. (कृषि विभाग, सिन्नर)**

कृषि उपविभाग, सिन्नरकडील कामे लेखापरीक्षण अहवालासोबत जोडलेले विवरणपत्र क्रमांक “ २ ” मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपूर्ण आहेत. ओटीएसपी/टीएसपीचे अपूर्ण कामावर माहे मार्च २००८ अखेर रुपये १,०५,०९६/- इतका खर्च झालेला आहे. कामे वेळीच पूर्ण न केलेने लाभार्थ्यांस त्याचा फायदा मिळू शकला नाही व भौतिक उद्दीष्टही साध्य झालेले नाही.

विहीरीची एकूण ४ कामे अपूर्ण आहेत. सदरच्या बांधकामांसाठी खालीलप्रमाणे अनुदान प्राप्त झालेले असून उर्वरीत शिल्लक अनुदान शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा न करता मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नाशिक यांना परत केलेली असल्याने रक्कम शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा केलेली असल्याची खात्री करता येत नाही. सदरची रक्कम शासकीय लेखाशिर्षाखाली वेळीच भरणा केल्याचे चलन दर्शवावे.

(आकडे रुपयांत)

| अ. क्र. | तपशिल | प्राप्त अनुदान | शिल्लक अनुदान | प्र. क्र. | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ओटीएसपी योजना विहीरी | ८२,६२४ | ५०,२३८ | ३० | ३१.३.०८ | मु.ले.वि.अ,नाशिक यांना परत |
| २ | एससीपी योजना विहीर | १,२०,००० | १७,१९० | ३२ | ३१.३.०८ | मु.ले.वि.अ,नाशिक यांना परत |
| | **एकूण** | २,०२,६२४ | ६७,४२८ | | | |

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग आदेश क्र. नाशिक/जचिअस-१२९८/प्र.क्र.१०४/ रोहयो-१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहिरींचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत सुरु करुन पुढील १२ महिन्यांच्या आत पूर्ण करावयाचे असतांना वरील प्रकरणी या शासन आदेशांचे पालन झालेले नाही.

२) सन २००६-२००७ पासून सन २००७-२००८ अखेरपर्यंत ४ विहीरी अपूर्ण असल्याने प्रत्येक लाभार्थ्यांकडून विहीत मुदतीत काम पूर्ण न झालेल्या कालावधीपासून अवरसचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ६५ दिनांक १३.९.२००१ अन्वये १८ % दराने व्याजासह दिलेल्या अनुदानाची दंडनीय वसुली करण्यांत यावी.

३) उपरोक्त नमुद परिशिष्टानुसार एकूण ४ कामे अपूर्ण असतांना अनुदान परत करणे नियमबाहय आहे. संबंधितांनी योग्य नियोजन न केल्याने अनुदान खर्च झालेले नाही. सदर बाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन शासनाचे क्षमपान घ्यावे.

वरील आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- जवाहर विहीरी योजने अंतर्गत अपूर्ण विहिरी बांधकामाबाबत.**

सोबतच्या परिशिष्ट क्रमांक “ २ ” मध्ये नमुद केल्याप्रमाणे लघुपाटबंधारे उपविभागाकडील दिनांक ३१.३.२००८ अखेर एकूण २८ कामे प्रलंबित असून त्यांपोटी रक्कम रुपये ८,१३,१२५/- खर्च झालेली आहे.

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग आदेश क्र. नाशिक/जचिअस-१२९८/प्र.क्र.१०४/ रोहयो-१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहिरींचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत सुरु करुन पुढील १२ महिन्यांच्या आत पूर्ण करावयाचे असतांना वरील प्रकरणी या शासन आदेशांचे पालन झालेले नाही.

२) सिन्नर उपविभागांतर्गत एकूण २८ विहीरींचे बांधकाम अपूर्ण आहे. सन २००२-२००३ पासून सन २००७-२००८ अखेरपर्यंत विहीरी अपूर्ण असल्याने प्रत्येक लाभार्थ्यांकडून विहीत मुदतीत काम पूर्ण न झालेल्या कालावधीपासून अवरसचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ६५ दिनांक १३.९.२००१ अन्वये १८ % दराने व्याज आकारणी करुन दंड वसुल करण्यांत यावा.

३) सन २००७-०८ मध्ये एकुण रक्कम रुपये ७,८६,०००/- इतके अनुदान प्राप्त झाले असून त्यापैकी रु.४,६८,१०९/- इतके खर्च झाले आहे व शिल्लक रक्कम रु. ३,१७,८९१/- इतकी रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक यांना प्रमाणक क्रमांक १२५० दिनांक ३१.३.२००८ नूसार अखर्चित अनुदान म्हणुन परत केलेली आहे. सदरची

रक्कम शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा न करता मुख्य लेखा व वित्त अधिकारी नाशिक यांना परत केलेली असल्याने रक्कम शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा केलेली असल्याची खात्री करता येत नाही. सदरची रक्कम शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा केल्याचे चलन लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करण्यात यावे.

४) उपरोक्त नमुद परिशिष्टानुसार एकूण २८ कामे अपूर्ण असतांना अनुदान परत करणे नियमबाहय आहे. उपविभाग लघुपाटबंधारे विभागाने योग्य ते नियोजन न केल्याने अनुदान खर्च झालेले नाही. सदर बाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन शासनाचे क्षमापन घ्यावे.

वरील आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २९ :- दलित वस्ती सुधार योजना अपूर्ण बांधकामाबाबत.**

सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक “ २ ” नुसार दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २००४ – २००५ पासून कामे अपूर्ण आहेत. सदरच्या अपूर्ण बांधकामांवर रक्कम रुपये २२,४९,९२०/- खर्च केलेला आहे. वेळीच कामे पूर्ण न झाल्यास दुरस्ती देखभाली अभावी कालांतराने त्यावर नैसर्गिक घटकांचा (ऊन, वारा, पाऊस) परिणाम होऊन अपूर्ण अवस्थेतील कामे नष्ट होऊन खर्च वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदरची कामे त्वरीत पूर्ण करुन त्यांचे हस्तांतरण व विनियोग प्रमाणपत्रांसह अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावीत.

---

**परिच्छेद क्रमांक ३० :- अर्धसमास पत्राद्वारे मागवलेली माहिती उपलब्ध झालेली नसल्याबाबत.**

सामान्य प्रशासन विभागाचे सन २००६ – २००७ चे लेखापरिक्षणाचे वेळी वेळोवेळी तोंडी सूचना व अर्धसमास पत्राद्वारे लेखी स्वरुपात आवश्यक माहिती मागविली होती. तथापि खालील नमूद माहिती प्राप्त झालेली नाही.

| अ क्र | अर्धसमास पत्र क्र. | दिनांक | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | ३ | १७.९.२००८ | प्रलंबित कोर्ट केसेस व अफरातफर प्रकरणांबाबत |
| २ | ४ | १७.९.२००८ | ग्रामपंचायत दप्तर तपासणी लक्षांकाबाबत (गौण ग्रामपंचायत लेखापरीक्षा) |
| ३ | ८ | १७.९.२००८ | ४ % सादिल व ५ वर्षावरील बी-एड धारक शिक्षकांची माहिती |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | ९ | १७.९.२००८ | शाळा खोल्यांच्या माहितीबाबत. |
| ५ | १७ | १७.९.२००८ | गौण ग्रामपंचायत लेखापरिक्षणाबाबत |
| ६ | १९ | १७.९.२००८ | ग्रामपंचायतींना दिलेल्या अग्रीमाचे समायोजन न करणेची माहिती |
| ७ | ३४ अे | २२.९.२००८ | दप्तर तपासणीबाबत (सर्व अधिकारी / कर्मचारी) |
| ८ | ३५ | २२.९.२००८ | रोजगार हमी योजना कृषी विभाग पूर्ण विहिरीबाबत |
| ९ | ४४ | १०.१०.२००८ | शालेय पोषण आहार मागणी प्रस्तावाबाबत. |
| १० | ३२ | २२.९.२००८ | निवृत्ती वेतन व कुटूंब निवृत्ती वेतनाचे नस्त्या / आदेश / पी पी ओ तपासणीस उपलब्ध करणेबाबत. |

उपरोक्त तपशिलातील माहिती वारंवार मागणी करुनही उपलब्ध केलेली नाही. ह्या संदर्भात अर्धसमासपत्राद्धारे मुंबई स्थानिक निधी लेखा नियम १९३० चे कलम ७ प्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी सविस्तर अहवाल मा. आयुक्त, यांचकडे पाठवण्यात येईल, असे सूचीत करुनही सदर माहिती सादर करणेबाबत उदासिनता दाखवलेली आहे, ही बाब अत्यंत खेदजनक आहे.

उपरोक्त नमुद माहिती लेखापरीक्षणांस उपलब्ध न केल्याने खर्चाचे संदर्भात व माहितीचे आधारे अंतिम निर्णयाप्रत जाता आलेले नाही वेळीच माहिती / उत्तरे सादर न करणेबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी.

ह्या अनियमिततेबाबत मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे क्षमापन प्राप्त करुन अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक ३१ :- वार्षीक लेखा.**

या लेखा परीक्षण अहवालांतील आक्षेपांचे पुर्ततेच्या अधिन राहून वार्षिक लेखे योग्य असल्याचे प्रमाणीत करण्यांत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक ३२ :- विवरणपत्र.**

या अहवाला सोबत आवश्यक ती विवरणपत्रे जोडण्यांत आलेली आहेत.

---

**परिच्छेद क्रमांक ३३ :- अनुपालन व पोहच.**

या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनुपालन अहवाल, मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) अन्वये, अहवाल प्राप्त झाले पासुन चार महिन्यांच्या आत पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने, या कार्यालयाकडे पाठविणेत यावा. तसेच प्रस्तुत अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवून पोहोच देण्यात यावी.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रत- सविनय सादर**

१. मा. सचिव, ग्रामविकास विभाग महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (पत्राने)
२. मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई.
३. मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
४. मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवीमुंबई.
५. मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक.

**प्रत- सस्नेह अग्रेषित.**

६. म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, मुंबई.
७. म. गट विकास अधिकारी (उच्चश्रेणी), पंचायत समिती-सिन्नर, जिल्हा नाशिक.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक